# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २३.०७.२०२६ गुरुवार**

**१) नागपूर शहर पोलीसांतर्फे नागपूर शहरातील जनतेस आवाहन :—**

नागपूर शहराच्या हद्दीत विविध संघटना, संस्था, राजकीय पक्ष तसेच नागरिकांकडून विविध मागण्या संदर्भात धरणे, आंदोलने, निषेध मोर्चे, नारेबाजी, निदर्शने व इतर सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

अशा प्रकारचे कार्यक्रम सार्वजनिक ठिकाणी आयोजित करण्यापुर्वी संबंधीत पोलीस ठाणे अथवा सक्षम पोलीस प्राधिकरणाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापि काही आयोजकांकडून कोणतीही पुर्व परवानगी न घेता अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे वाहतुक व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर प्रतिकुल परिणाम होऊ शकतो.

त्यामुळे सर्व संघटना, संस्था, राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणतेही धरणे, आंदोलन, निषेध मोर्चा, नारेबाजी किंवा तत्सम सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यापुर्वी संबंधीत पोलीस ठाणेकडे विहित प्रक्रियेनुसार आवश्यक परवानगीकरीता अर्ज करावा व परवानगी प्राप्त झाल्यानंतरच कार्यक्रम आयोजीत करावा.

विनापरवाना सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करणाऱ्या संबंधीत आयोजकांवर लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींनुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) बहुजन वंचित आघाडी पक्षामार्फतीने राज्यव्यापी बंद दरम्यान नागपूर शहर पोलीस दलातर्फे बंदोबस्त शांततेत पार पाडल्याबाबत.**

नीट पेपरफुटी प्रकरणी जंतर—मंतर, नवी दिल्ली येथे आंदोलनकर्ते विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलीसांकडून करण्यात आलेल्या लाठीचार्जचे निषेधार्थ, दिनांक २३.०७.२०२६ रोजी बहुजन वंचित आघाडी पक्षातर्फे महाराष्ट्र राज्यव्यापी बंद पुकारण्यात आला होता. त्याअनुषंगाने नागपूर शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होऊन कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरीता, मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्यीतील महत्वाचे व संवेदनशिल ठिकाणे तसेच चौक येथे योग्य तो पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. बंदोबस्तादरम्यान अधिक बळाची आवश्यकता भासल्यास, प्रत्येक पोलीस ठाणे येथे प्रत्येकी १ अधिकारी १० अंमलदार राखीव ठेवण्यात आले होते.

त्याचप्रमाणे, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ येथुन एकुण ०३ प्लाटुन मध्ये ०३ अधिकारी व ८० अंमलदार यांना गांधी चौक, संविधान चौक व व्हेरायटी चौक येथे तैनात करण्यात आले होते. संविधान चौक येथे दंगा नियंत्रण पथक व पोलीस मुख्यालयातील ६ अधिकारी व ८० अंमलदार यांना तैनात करण्यात आले होते.

पोलीस नियंत्रण कक्ष नागपुर शहर येथे दंगा नियंत्रण पथकाचे ०३ पथकात ११ अधिकारी व ६३ अंमलदार, पोलीस मुख्यालय मार्फतीने एकुण ४ पथकात ७ अधिकारी व १३४ अंमलदार राखीव ठेवण्यात आले होते. पोलीस मुख्यालय मार्फतीने पुरुष प्रशिक्षणार्थी पोलीसांचे व महिला प्रशिक्षणार्थी पोलीसांचे पथक निर्माण करून त्यामध्ये ०२ कवायत प्रशिक्षक व ११९ प्रशिक्षणार्थी अंमलदार यांना राखीव ठेवण्यात आले होते. पोलीस भवन येथे विशेष शाखा व पोलीस आयुक्त कार्यालयातील एकुण १७ अधिकारी व ९४ अंमलदार यांना राखीव ठेवण्यात आले होते. त्याचप्रमाणे नागपुर शहर पोलीस आयुक्तालया अंतर्गत संपुर्ण पो. ठाणे, शाखा येथील कार्यालयीन पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्या—त्या ठिकाणी अलर्ट राहण्याचे आदेश करण्यात आले होते.

सदरील महाराष्ट्र राज्यव्यापी बंद दरम्यान योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमल्याने कोणताही अनुचीत प्रकार न घडता, बंदोबस्त शांततेत पार पडला.





**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा, सोनसाखळी चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०८.०७.२०२६ चे २०.३० वा. ते २१.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी बंडु खुशालराव मंडपे, वय ६३ वर्षे, रा. प्लॉट नं. ५४, बुध्द विहार जवळ, अजनी चौक, नागपुर हे पोलीस ठाणे धंतोली हद्दीतील लोकमत चौक येथील जैन मेडीकल समोरून पायदळ जात असतांना, त्यांचे मागुन एका दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी आरोपींनी फिर्यादीचे गळ्यातील सोन्याची चैन वजनी ४ तोळे किंमती १,६९,३८०/—रू. चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन, त्यांचे दुचाकीने पळुन गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे अनोळखी आरोपींविरूध्द कलम ३०४,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींना निष्पन्न केले. आरोपी क्र. १) जयेश उर्फ मोटु राजु चौधरी, वय २३ वर्षे, रा. पांढुर्णा, कामठीकला, मध्यप्रदेश, ह.मु. मेयो हॉस्पीटल परीसर, गार्ड लाईन, तहसिल, नागपुर २) नविन सुधाकर करीहार, वय ३७ वर्षे, रा. गार्ड लाईन रोड, माता मंदीर जवळ, तहसिल, नागपुर यांना ताब्यात घेवुन विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन सोन्याची चैन, ०२ मोबाईल फोन तसेच, एक पांढऱ्या रंगाची दुचाकी क्र. एम. एच. ४९ ए.वाय. ७२७४ आणि एक जांभळ्या काळ्या रंगाची होंडा डिओ मोपेड क्र. एम.एच. ४० टि. ५४०८ असा एकुण ७,१२,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव धंतोली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मसपोनि. श्रीमती मंगला हदडे, पोहवा. मनिष बुरडे, प्रफुल्ल मानकर, संतोष गुप्ता, संदीप भोकरे, पोअं. कुणाल लांडगे, अनिकेत इंगळे व संदीप पडोळे यांनी केली.




**२) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक २२.०७.२०२६ चे २२.१० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, राहुल राऊत नावाचा हद्दपार इसम हा भिमनगर, पाण्याचे टाकीजवळ फिरत आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, परिसरात पाहणी केली असता, मिळालेल्या वर्णनाचा ईसम हा दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल गौतम राऊत वय २४ वर्षे, रा. भिमनगर, वार्ड क्र. ४, एमआयडीसी, नागपुर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. गोकुळ महाजन, पोहवा. दीपक सराटे, पोअं. निलेश दुबे व रवि राठोड यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे कळमणा :— जबरी संभोग करणाऱ्या आरोपीस अटक.**

पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, राहणाऱ्या ३७ वर्षीय फिर्यादी यांचा परिचीत आरोपी चंद्रशेखर रमेश किरपाने, वय ३६ वर्षे रा. कळमणा, नागपूर याचेसोबत मैत्रीपुर्ण संबंध होते. दिनांक १०.०६.२०१० चे १६.०० वा. ते दि. ०३.०३.२०२६ वा. १७.०० वा. चे दरम्यान, आरोपीने फिर्यादीसोबत लग्न करण्याचे आमिष दाखवून तिचेसोबत वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. फिर्यादीने आरोपीला लग्नासाठी विचारले असता, आरोपीने फिर्यादीसोबत काढलेले व्हिडीयो व फोटो वायरल करण्याची धमकी देऊन, तिला लग्नास नकार दिला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिनांक २२.०७.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. अजय गरजे ८८३०००१७०२ यांनी आरोपीविरूध्द कलम ६९,३५१(२) भा.न्या.सं. कायद्यान्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे तहसील</u> :—** दिनांक २१.०७.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे भाऊ नामे बलराम प्रसादी यादव वय ३५ वर्ष, रा. ग्राम भैसनवाडी ता. लखनादौन, जि. शिवनी, मध्यप्रदेश हे पोलीस ठाणे तहसील हद्दीत, मोमीनपुरा येथील हॉटेल तनवीर येथे मलबा हटविण्याचे काम करीत असतांना, त्यांचे अंगावर अचानक भिंत पडल्याने, त्याखाली दबून ते गभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता सेव्हन स्टार हॉस्पिटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २३.०७.२६ चे ०१.२५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यापकरणी फिर्यादी राधेश्याम प्रसादी यादव वय ३२ वर्ष रा. ग्राम भैसनवाडी ता. लखनादौन, जि. शिवनी, मध्यप्रदेश यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. गायत्री भरडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०३६४७ /२०११ | कलम १३५ म.पो.का. | राजेश वंजारी वय २१ वर्ष रा. मालभल्ला, सतरंजीपुरा, नागपुर | १३.०८.२०२६ |
| २. | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०२२५३ /२००७ | कलम ३८० भा.दं.वि. | १) दीपक डी. गिल्लोर वय २० वर्ष रा. मिनी माता नगर, सुरेश पेंटर हाऊस, पोलीस ठाणे कळमणा, नागपूर. | ११.०८.२०२६ |
| ३. | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०३१९७ /२००६ | कलम २९४, ३२३,५०४, ५०६ ब भा.दं.वि. | निरज उर्फ गोलु एस. नामदेव वय २१ वर्ष रा. बांग्लादेश चौकी मागे, दुर्गामाता मंदीर जवळ, सचिन यांचे घरी किरायाने, पोलीस ठाणे पाचपावली, नागपूर. | ११.०८.२०२६ |
| ४. | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४०३० /२००९ | कलम ४२० भा.दं.वि. | विजय एम महाजन वय ३५ वर्ष रा. गोकुलधाम अपार्टमेंट, एफसीआय गोडावून चुनाभट्टी, अजनी, नागपूर. | १३.०८.२०२६ |

स्वा/–

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.